RNI No. MAHBIL /2009/31732
Reg. No. MCS/172/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ३, अंक १६] गुरुवार ते बुधवार, मे १८-२४, २०१७/वैशाख २८-ज्येष्ठ ३, शके १९३९ [पृष्ठे ४
[किंमत : रुपये ९.००]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल २०१७

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि. २००८/प्र.क्र. ७२/टेक्स-२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील वस्त्रोद्योग संचालनालयाच्या अखत्यारीतील सहाय्यक संचालक (तांत्रिक), गट-ब (राजपत्रित), महाराष्ट्र तांत्रिक सेवा या पदांच्या सध्या अस्तित्वात असलेल्या नियम, आदेश अथवा अन्य साधने यांच्या ऐवजी सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. नियमांना वस्त्रोद्योग संचालनालयाच्या अखत्यारीतील सहाय्यक संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र तांत्रिक सेवा, गट-ब (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०१७ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) " पदवी " याचा अर्थ, सांविधीक विद्यापीठाची पदवी ;

(क) " विभाग " याचा अर्थ, शासनाचा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ;

(ड) " पदविका " याचा अर्थ, सांविधीक विद्यापीठाची पदविका किंवा मान्यताप्राप्त संस्थेची पदविका ;

(इ) " संचालनालय " याचा अर्थ, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर ;

(फ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन ;

(ग) " मान्यताप्राप्त संस्था " याचा अर्थ, राज्य शासन किंवा केंद्र शासनाने मान्यता दिलेली संस्था.

३. सहाय्यक संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र तांत्रिक सेवा, गट-ब (राजपत्रित) या पदावरील नियुक्ती खालील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) तांत्रिक सहाय्यक (यंत्रमाग) किंवा वरिष्ठ पणन अधिकारी हे पद धारण करणाऱ्या व या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व या नियमाच्या उप नियम (ब) मधील उप-खंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता, अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता याआधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे ;

**किंवा**

(ब) खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून आयोगामार्फत नामनिर्देशानेः—

(एक) ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नाही.

परंतु अगोदरपासून शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

(दोन) ज्यांनी केंद्र शासनाने किंवा अखिल भारतीय हातमाग मंडळ, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेली हातमाग तंत्रज्ञानातील पदविका धारण केली आहे किंवा वस्त्रोद्योग तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग निर्माणशास्त्रातील पदविका धारण केली आहे, परंतु हातमाग तंत्रज्ञानातील किंवा वस्त्रोद्योग तंत्रज्ञानातील पदवी धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल ;

(तीन) ज्यांनी या उप नियमाच्या उप खंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर, कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय कार्यालयातील किंवा शासनाने स्थापन केलेल्या औद्योगिक संस्था, वाणिज्यिक संस्था, स्थानिक संस्था, महामंडळ, मंडळ यातील हातमाग, यंत्रमाग आणि सुतगिरणी या संबंधीच्या कामाचा किमान तीन वर्षे इतक्या कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव धारण केला आहे ; आणि

(चार) ज्यांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे अनुक्रमे ७५:२५ या प्रमाणात करण्यात येईल.

५. नियम ३ मधील पदावर नामनिर्देशनाने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर राहील, परिवीक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे तसेच विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे आणि परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याने किंवा तिने प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण न केल्यास किंवा विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास किंवा परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण न केल्यास किंवा तो किंवा ती सदर पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास, त्याची किंवा तिची सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर त्याला किंवा तिला सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित करण्यात आलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली केली जाण्यास पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ब. बा. चव्हाण,**
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

क्रमांक :-सेप्रनि-२००८/प्र.क्र.७२/टेक्स-२
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
नवीन प्रशासकीय भवन, १६ वा माळा,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १८ मे २०१७.

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य , मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
८. सहकार आयुक्त, पुणे,
९. संचालक (वस्त्रोद्योग), संचालनालय, नागपूर,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,
११. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/विधानपरिषद), मुंबई,
१३. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१४. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१५. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१६. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१७. *अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८. *अधिदान व लेखा अधिकारी, नागपूर,
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, (२ प्रती प्रसिद्धीसाठी),
२०. *सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२१. *निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२२. प्रादेशिक उप संचालक (मुंबई, नागपूर, सोलापूर व औरंगाबाद),
२३. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती),
२४. निवड नस्ती .

---

*पत्राद्वारे

**प्र. शं. रोडे,**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.